# <u>प्रवेश सूचना</u>

## आय.आय.एच.टी बरगर/वेंकटगिरी

केंद्र शासनाच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२०-२१ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहा सत्रीय) **हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका** अभ्यास क्रमाच्या प्रथम सत्राकरिता महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडिशा) करीता **आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील** १ जागेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराची निवड करण्याकरीता प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर/ सोलापूर/मुंबई/औरंगाबाद यांचे मार्फत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज दि. १५/१०/२०२० पर्यंत मागविण्यात येत आहेत. तरी सर्व उमेदवारांनी त्यांचे परिपूर्ण अर्ज इंग्रजीमध्ये टंकलिखीत करुन आवश्यक सर्व कागदपत्रासह दि. ०९/१०/२०२० चे आत संबंधीत प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, यांचे मार्फत सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे. तसेच अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालयात देखील उपलब्ध आहे.

**<u>अर्जदाराची प्रवेशासाठी विहित अर्हता :</u>**

१. अर्जदाराचे वय दिनांक १६/०७/२०२० रोजी १५ ते २३ वर्षापर्यंत असावे.

२. अर्जदाराने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र १० वी ची किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. तसेच अभ्यासक्रमात इंग्रजी विषय असावा.

परंपरागत विणकर समाजातील उमेदवारास किंवा जे या व्यवसायात आहेत, अश्या उमेदवारांनी खालील पैकी कोणत्याही एका प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रवेश अर्जासोबत जोडावी. (विणकर फोटो ओळख पत्र / विणकर क्रेडिट कार्ड / विणकर हेल्थ कार्ड / विणकर यार्न पासबुक / विणकर सेवा केंद्र किंवा राज्य शासन कार्यालयाचे ओळखपत्र)

भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेच्या नियमानुसार निवड करण्यांत आलेल्या उमेदवार पदविकेच्या प्रथम वर्षाकरीता रु. १०००/- द.म. द्वितीय वर्षाकरीता रु. ११००/- द.म. व तृतीय वर्षाकरीता रु. १२००/- द.म. विद्यावेतन घेण्यास पात्र राहील.

वरील अभ्यास क्रमाकरीता अर्ज स्विकारण्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज मिळण्याचा दिनांक | दिनांक २९/०९/२०२० ते ०९/१०/२०२० (दुपारी २.०० वाजेपर्यंत) |
| २ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक ०९/१०/२०२० रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत |
| ३ | अर्ज मिळण्याचे व स्विकारण्याचे ठिकाण | **१) प्रादेशिक उप आयुक्त , वस्त्रोद्योग, नागपूर यांचे कार्यालय** प्रशासकीय इमारत क्र.२, आठवा माळा, बी-विंग, जिल्हा परिषद कार्यालयासमोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१. |

| | | |
|---|---|---|
| | | (दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५३७९२७)<br>**२) प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांचे कार्यालय**<br>टेलीफोन एक्सचेंज इमारत, ५ वा माळा, माऊली मडळ रोड,<br>चरई, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१.<br>(दुरध्वनी क्रमांक ०२२-२५४०५३६३)<br>**३) प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर यांचे कार्यालय**<br>जिल्हा महसूल कर्मचाऱ्याची सहकारी पत संस्था इमारत,<br>जिल्हाधिकारी आवार, सोलापूर ४१३ ००१.<br>(दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३२३१६१)<br>**४) प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, औरंगाबाद यांचे कार्यालय**<br>बाळासाहेब पवार सहकार भवन, ३ रा माळा, मोंढा रोड,<br>जाफरगेट जवळ, औरंगाबाद ४३१ ००१.<br>(दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९७००५८) |

दिनांक ०९/१०/२०२० नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ह्याची कृपया नोंद घ्यावी.

29/09/2020

(डॉ. माधवी खोडे चवरे)
भा.प्र.से
आयुक्त वस्त्रोद्योग,
महाराष्ट्र राज्य, नागपूर

# <u>प्रेस नोट</u>

## <u>आय.आय.एच.टी बरगढ (ओडीशा) येथे प्रथम सत्राकरीता प्रवेश सूचना</u>

केंद्र शासनाच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२०-२१ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहा सत्रीय) **हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका** अभ्यास क्रमाच्या प्रथम सत्राकरिता महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडिशा) **आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील** १ जागेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्याकरीता प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर/सोलापूर/मुंबई /औरंगाबाद यांचे मार्फत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज दि. ०९/१०/२०२० पर्यंत मागविण्यात येत आहे. प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे वेबसाईट http.www.dirtexmah.gov.in वर उपलब्ध आहे. तसेच सदर अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालयात देखील उपलब्ध आहे. असे डॉ. माधवी खोडे चवरे, भा.प्र.से. आयुक्त वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कडून कळविण्यात आले आहे.

----------------- |||| ----------------